शासन वि.सोमेश

**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०५ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः राहुल मनोहर खराडे,

वयः ४५ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः वरचा मोहला, रोहा, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. अंदाजे ३ ते ४ वर्षापूर्वी मी केबलचे काम करीत असतांना, पोलीसांनी मला पोलीस स्टेशन, रोहा येथे बोलाविले होते. तेथे पोलीसांनी एका फॉर्मवर माझी सही घेतली होती. नंतर पोलीसांनी मला व माझा मित्र अस्मीत रनदिवे याला आरोपीसह मौजे सुडकोली येथे नेले होते. त्यावेळी आरोपीने त्याचे घरातील कपाटात ठेवलेले हातात घालायचे कडे आम्हाला दाखविले. ते पोलीसांनी त्यांचे ताब्यात घेतले. तेथे पोलीसांनी फोटो काढले. त्याव्यतिरिक्त त्यांनी तेथे इतर कार्यवाही केली नव्हती.

**साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०२. आता मला दिनांक २५.१२.२०१८ रोजीचा निवेदन पंचानामा व मेमोरंडम पंचनामा दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर माझ्या सहया आहेत. सदर दस्तांमधील मजकुराबाबत मला आठवत नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २५.१२.२०१८ रोजी पोलीसांनी मला व अस्मीत रणदिवे याला पोलीस स्टेशन, रोहा येथे बोलाविले होते, त्यावेळी आरोपीने पोलीसांचे समोर गुन्हयात वापरलेले कडे त्याने त्याचे घरी ठेवले आहे, तो ते दाखविण्यास तयार आहे, असे सांगितले होते, त्याअनुषंगाने पोलीसांनी आरोपीचे निवेदन लिहून घेतले व त्यानंतर माझी सही घेतली, त्यानंतर आम्ही आरोपीसह त्याचे सांगण्याप्रमाणे मौजे चणेरा मार्गे सुडकोली येथे आरोपीचे घरी गेलो, त्यावेळी आरोपीने त्याचे घरातील कपाटात ठेवलेले स्टीलचे मनगटी कडे काढुन दिले, ते पोलीसांनी माझे समक्ष खाकी लिफाफ्यामध्ये सिलबंद केले, त्यावर त्यांनी माझी सही घेतली, त्याअनुषंगाने पोलीसांनी माझे समक्ष पंचनामा तयार केला, नंतर मी त्यावर सही केली, नमुद दोन्ही पंचनाम्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र. २९** व **३०** देण्यात येतो. त्यापैकी निवेदन पंचनामा नि.क्र.२९ मधील अधोरेखांकित भाग अ मधील मजकुरास नि.क्र.२९ देण्यात येतो.

०४. आता मला जप्त मुद्देमाल हातामध्ये घालायचे स्टीलचा मनगटी कडा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यास **वस्तु अ** देण्यात येतो. आज न्यायालयामध्ये आरोपीचे पिंज–यात बसलेल्या व्यक्तीनेच वस्तु अ वरील कडयाच्या अनुषंगाने माहिती दिली होती. परंतु मी त्याला ओळखत नाही.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. पी. एच. पाटकर यांचे मार्फत.**

०५. मी व अस्मीत रणदिवे मागील १५ वर्षापासून शिवराज केबलस यांचेकडे केबल ऑपरेटर म्हणून काम करतो. पोलीसांनी माझी फॉर्मवर सही

घेतली त्या दिवशी मी रोहा शहरातील तहसील कार्यालयामध्ये केबलचे काम करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी पोलीसांनी मला फोन करून बोलाविले होते, तहसील कार्यालय व पोलीस स्टेशन, रोहा हे एकाच परिसरामध्ये आहे. पोलीसांनी मला दुपारी ४.०० वाजताच्या दरम्यान पोलीस स्टेशनमध्ये बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी सही केलेला फॉर्म वाचून बघितलेला नव्हता, त्यातील मजकुराची वाचुन मी खात्री केली नव्हती.

०६. हे म्हणणे खरे आहे की, रोहा शहरापासून सुडकोली अंदाजे २२ कि.मी. अंतरावर आहे, आम्ही सुडकोली येथे जाण्याकरति वापरलेले वाहन खाजगी होते किंवा शासकीय व त्याचा नोंदणी क्रमांक काय होता या बाबी मी सांगु शकत नाही, त्याचप्रमाणे ज्या घरामधुन कडे काढण्यात आले त्या घराचा क्रमांक मी सांगु शकत नाही, त्याचप्रमाणे सदर कडे घरातील कोणत्या खोलीमधुन व कोणत्या कपाटामधुन काढण्यात आले होते याची खात्री मी स्वतः घरामध्ये जावून केली नव्हती.

०७. घरामध्ये प्रवेश करण्यापुर्वी पोलीसांनी त्यांची अंगझडती मला दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मेमोरंडम पंचनामा देखील मी वाचलेला नाही, तो किती वाजता सुरु करून किती वाजता संपविण्यात आला हे मी सांगु शकत नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, वस्तु अ वरील कडयाप्रमाणे कडे बाजारामध्ये सहजपणे विक्रीस उपलब्ध असतात. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५.१२.२०१८ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशन, रोहा येथे बोलाविले नव्हते, त्यावेळी आरोपीने तेथे गुन्हयात वापरलेले कडे काढून देण्याची तयारी दाखविली नव्हती, त्यानंतर त्याचेसही आम्ही चणेरा मार्गे सुडकोली येथे गेलो

नव्हतो, तेथुन त्याचे घरातील कपाटामधुन आरोपीने वस्तु अ वरील कडे पोलीसांना काढुन दिले नव्हते, ते पोलीसांनी खाकी लिफाफ्यामधे सिलबंद केले नव्हते, त्या अनुषंगाने पोलीसांनी निवेदन व मेमोरंडम पंचनामा तयार केला नव्हता, पोलीसांचे सांगण्यावरून मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपासणी पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.09.06 15:16:22 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.०६.०९.२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.